**श्री. सचिन पाटील, मोटार वाहन निरीक्षक, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांना शासन सेवेतून निलंबित करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**H.D.49011/42/2025-TRANSPORT 3-MHD-Home Department**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०४ मे, २०२६

वाचा :- १) परिवहन आयुक्त यांचे पत्र क्र. परिवहन आयुक्त कार्यालयाचे पत्र क्र. पआका/का.८अ/बाह्यसंस्था नियुक्ती/ २०२५/जा.क्र.१२२३२, दिनांक ०६.१०.२०२५.
२) परिवहन आयुक्त कार्यालयाचे पत्र क्र. पआका/का.८अ/बाह्यसंस्था नियुक्ती/ २०२५/जा.क्र.११२१९, दिनांक १६.०९.२०२५.
३) परिवहन आयुक्त कार्यालयाचे पत्र क्र. पीईआर-३८,३९,५१/२०२५/ पआका/दवि/२५/ जा.क्र.१४७२८, दिनांक ०३.१२.२०२५.
४) परिवहन आयुक्त कार्यालयाचे पत्र क्र. पआका/का.८अ(४)/वैभव फडतरे/चौ.अहवाल/ २०२६/जा.क्र.३१६७, दिनांक १७.०३.२०२६.

**शासन आदेश:-**

ज्याअर्थी, श्री. सचिन पाटील, मोटार वाहन निरीक्षक हे वाहन क्रमांक एम.एच. ०४ केआर ६४७७, वायुवेग पथक क्रमांक १, देवनार, मुंबई येथे दिनांक २८.०५.२०२५ रोजी कर्तव्यावर होते. श्री. सचिन पाटील, मोटार वाहन निरीक्षक यांनी आपली ई-चालान मशिन वाहन चालकाच्या ताब्यात देवून त्या चालकास अधिकार नसतांना फोटो काढण्याबाबत आदेशीत करुन आपल्या कर्तव्यात निष्काळजीपणा केला आहे. याबाबतचे वृत्त विविध वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाले आहे आणि याबाबतची व्हिडिओ क्लिप विविध समाजमाध्यमांमध्ये प्रसारित झाली आहे. त्यामुळे, शासनाची प्रतिमा मलीन झाली असून सदर बाब महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांचा भंग करणारी आहे;

ज्याअर्थी, उक्त अनियमिततेच्या अनुषंगाने श्री. सचिन पाटील, मोटार वाहन निरीक्षक यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ खाली शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे योजिले आहे;

त्याअर्थी, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ (१)(अ) अन्वये शासन याद्वारे श्री. सचिन पाटील, मोटार वाहन निरीक्षक, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांचे या आदेशाच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक ०४.०५.२०२६ पासून शासन सेवेतून निलंबन करण्यात येत आहे;

आणखी असेही आदेश देण्यात येत आहेत की, जोपर्यंत हे आदेश अंमलात असतील तेवढ्या कालावधीसाठी श्री. सचिन पाटील, मोटार वाहन निरीक्षक यांचे मुख्यालय परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई हे राहील. तसेच त्यांना सह परिवहन आयुक्त (अंमल-२), परिवहन आयुक्त कार्यालय यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

हे आदेश अस्तित्वात राहतील त्या कालावधीसाठी श्री. सचिन पाटील, मोटार वाहन निरीक्षक यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा, निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम-१९८१ च्या नियम- ६८ अन्वये निर्वाहभत्ता व त्यावरील इतर भत्ते देय राहतील.

याबाबत पुढे असेही आदेश देण्यात येत आहेत की, श्री. सचिन पाटील, मोटार वाहन निरीक्षक यांनी निलंबन कालावधीमध्ये कोणतीही खाजगी नोकरी स्विकारु नये किंवा कोणत्याही व्यापारात अथवा धंद्यात स्वत:ला गुंतवू नये. तसेच त्यांनी त्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा, निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ६९ पोटनियम (४) अन्वये आवश्यक असलेले प्रमाणपत्र दिल्याखेरीज त्यांना निर्वाहभत्ता देण्यात येऊ नये. निलंबन कालावधीमध्ये त्यांनी खाजगी नोकरी स्विकारली अथवा कोणताही व्यापार किंवा धंदा केला तर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम १६ चा भंग केल्याबद्दल त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यास ते पात्र ठरतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५०४१५२६४५६३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHETAN BALASAHEB NIKAM

Digitally signed by CHETAN BALASAHEB NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department,
2.5.4.20=946F8EFF01148466E26F8D80863DA34D0A26661F5EEFB602C359549D8ED4511E, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7268DE40660971F80951C66D0E657E903B378196F51A978D2A366CF5EB564C0C, cn=CHETAN BALASAHEB NIKAM
Date: 2026.05.04 15:27:50 +05'30'

**(चेतन निकम)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

श्री. सचिन पाटील, मोटार वाहन निरीक्षक,
परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.
(परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत).

प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित:-

१) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदर आदेशाची एक प्रत श्री. सचिन पाटील, मोटार वाहन निरीक्षक, परिवहन आयुक्त कार्यालय यांच्यावर त्वरीत बजावून दुसऱ्या प्रतीवर त्यांची दिनांकासहित पोच स्वाक्षरी घेऊन सदर प्रत खास दुतामार्फत शासनास सादर करावी. (दोन जादा प्रतींसह).

२) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर.

३) निवड नस्ती (परि-३).